## आजचे पंचांग

बुधवार, दि. ३ जून २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, कृष्णपक्ष, तृतीया रात्री ९-२२ पर्यंत नंतर चतुर्थी तिथी, दिवस नक्षत्र- पूर्वाषाढा रात्री १-०० पर्यंत नंतर उत्तराषाढा, चंद्र रास - धनु, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - कर्क

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## जमिनीचे तापमान वाढले

**पुणे :** पुणे-मुंबईला जोडणारी आणि चाकरमान्यांची लाडकी असलेल्या 'डेक्कन क्वीन' रेल्वेचा पुणे रेल्वेस्थानकावर ९७ वा वाढदिवस सोमवारी सकाळी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. झेंडूच्या फुलांनी सजवलेल्या या गाडीचे प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर जंगी स्वागत करण्यात आले. वाजतगाजत, फुलांनी सजून वाढदिवस साजरा झाल्यावर या रेल्वेने चाकरमान्यांना घेऊन मुंबईकडे प्रस्थान केले. रेल्वे प्रवासीच्या अध्यक्षा हर्षा शहा यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार, दि. ०३ जून, २०२६ | वर्ष - १ | अंक - २४८ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### अपघाती गोळीबारात जवान जखमी

**जम्मू :** जम्मू रेल्वे स्थानकावर ट्रेनची वाट पाहत असताना सर्व्हिस रायफलमधून चुकून गोळीबार झाल्याने एक सीआयएसएफ जवान जखमी झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अमरनाथ यात्रेच्या कर्तव्यावर तैनात होण्यासाठी रेल्वे स्टेशनवर ट्रेनची वाट पाहत असताना सीआयएसएफ जवानाची ही घटना घडली. जखमी जवानाला तात्काळ वैद्यकीय मदत देण्यात आली.

### आसाम: १ कोटींचे अंमली पदार्थ जप्त

**जोरहाट :** आसामच्या जोरहाट जिल्ह्यात मंगळवारी सुमारे १ कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आणि दोन तस्करांना अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी दिली. विशिष्ट माहिती मिळाल्याच्या आधारे, एका पथकाने जोरहाट सदर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वर्दळीच्या चोलोधारा परिसरातून मोटारसायकलवर आलेल्या दोन आरोपींना अडवले, असे त्यांनी सांगितले. शोध मोहिमेदरम्यान, पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून २२ पाकिटांमध्ये लपवलेले हेरॉईन आणि रोकड जप्त केली.

### काँग्रेसची सरसकट कर्जमाफीची मागणी

**मुंबई :** महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीच्या अंमलबजावणीवर शंका उपस्थित करत, काँग्रेस आणि शरद पवार गटाने सर्व शेतकऱ्यांच्या जमिनीच्या नोंदींमधील थकीत कृषी कर्जे निकाली काढून त्यांना सरसकट कर्जमाफी देण्याची मागणी केली. मंत्रिमंडळाने २ लाख रुपयांपर्यंतच्या कृषी कर्जमाफी योजनेला मंजुरी दिली, या निर्णयामुळे सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना फायदा होण्याची अपेक्षा आहे.

### शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी मंत्रालयासमोर निदर्शने

# सीबीएसईप्रश्नी जेन झी आक्रमक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सीबीएसई परीक्षा मूल्यमापन पद्धतीतील कथित घोटाळा आणि 'ऑन-स्क्रीन मार्किंग' (ओएसएम) प्रणालीच्या खरेदी प्रक्रियेतील अनियमिततेचे पडसाद आता रस्त्यावर उमटू लागले आहेत. या कारभारामुळे संतप्त झालेल्या दिल्ली विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसह 'जेन झी' म्हणजेच तरुण पिढीने थेट केंद्रीय शिक्षण मंत्रालयाबाहेर धडक देत भयंकर विरोध प्रदर्शन केले. आंदोलक विद्यार्थ्यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी केली असून, या आंदोलनामुळे दिल्लीतील राजकीय आणि



शैक्षणिक वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

सीबीएसईचे अध्यक्ष आणि सचिव यांची तडकाफडकी बदली झाल्यानंतर आणि ओएसएम प्रणालीच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन झाल्यानंतर विद्यार्थ्यांमधील असंतोष अधिकच वाढला आहे. "विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या शिक्षण मंत्र्यांनी पदावर राहण्याचा नैतिक अधिकार गमावला आहे," असा आरोप करत शेकडो विद्यार्थ्यांनी शिक्षण मंत्रालयाला वेढा घालण्याचा प्रयत्न केला. 'आम्हाला न्याय हवा', "भ्रष्ट कारभाराचा निषेध असो' आणि 'शिक्षण मंत्री राजीनामा द्या' अशा घोषणांनी दिल्लीचा परिसर दणाणून गेला होता.

यंदा बारावीच्या परीक्षांसाठी लागू करण्यात आलेल्या ऑन-स्क्रीन मार्किंग प्रणालीतील तांत्रिक त्रुटी आणि गुणदानातील मोठ्या विसंगतीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्याचा दावा आंदोलक तरुणांनी केला आहे. "हा केवळ तांत्रिक बिघाड नसून कोट्यवधी रुपयांच्या निविदा प्रक्रियेतील भ्रष्टाचार आहे. बोर्डाच्या अधिकाऱ्यांची बदली करून मुख्य सूत्रधारांना वाचवण्याचा प्रयत्न केला जात आहे," असा थेट आरोप विद्यार्थी प्रतिनिधींनी केला.

या भयंकर आंदोलनामुळे शिक्षण मंत्रालयाबाहेर मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलिसांनी आंदोलक विद्यार्थ्यांना रोखण्याचा प्रयत्न केला, मात्र तरुण आपल्या मागण्यांवर ठाम होते. संसदेच्या स्थायी समितीनेही या प्रकरणाची दखल घेतलेली असताना, आता देशातील तरुण पिढी रस्त्यावर उतरल्याने केंद्र सरकारवरील दबाव प्रचंड वाढला आहे. परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित होईपर्यंत हे आंदोलन थांबणार नाही, असा इशारा आंदोलक विद्यार्थ्यांनी दिला आहे.

## सीबीएसई अध्यक्ष आणि सचिवांची उचलबांगडी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळात केंद्र सरकारने मोठे प्रशासकीय फेरबदल केले असून मंडळाचे अध्यक्ष आणि सचिव यांची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. इयत्ता बारावीच्या परीक्षांसाठी यंदा लागू करण्यात आलेल्या ऑन-स्क्रीन मार्किंग प्रणालीतील वाद आणि सेवांच्या खरेदी प्रक्रियेतील कथित अनियमिततेच्या आरोपांमुळे केंद्र सरकारने हा कडक पाऊल उचलल्याची माहिती समोर आली आहे.

माहितीनुसार, ओएसएम सेवांच्या खरेदी प्रक्रियेबाबत सध्या चौकशी सुरू आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी सीबीएसईने एका उच्चस्तरीय चौकशी समितीची स्थापना केली आहे. संबंधित निविदा प्रक्रिया, सेवांची खरेदी आणि त्याच्या अंमलबजावणीतील त्रुटींचा ही समिती तपास करणार असून, तिचा अहवाल लवकरच सादर केला जाण्याची शक्यता आहे.

इयत्ता बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी यंदा प्रथमच मोठ्या प्रमाणावर 'ऑन-स्क्रीन मार्किंग' प्रणाली लागू करण्यात आली होती. मात्र, पहिल्यापासूनच या प्रणालीवर विद्यार्थी, पालक आणि शिक्षण तज्ज्ञांकडून तीव्र आक्षेप घेण्यात आले. मूल्यमापनातील विसंगती, तांत्रिक अडचणी आणि पारदर्शकतेचा अभाव यांमुळे सीबीएसईवर टीका झाली होती. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन संसदेच्या स्थायी समितीनेही यात हस्तक्षेप केला आहे. निविदा प्रक्रियेतील अनियमितता, तांत्रिक त्रुटी आणि मूल्यमापन प्रक्रियेबाबत समितीने संबंधित अधिकाऱ्यांकडे स्पष्टीकरण मागवले आहे.

## सीजेपी उतरणार रस्त्यावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सोशल मीडियावर अल्पावधीत मोठी लोकप्रियता मिळवलेल्या कॉकरोच जनता पार्टी या संघटनेचा संस्थापक अभिजित दीपके याने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी भारतात येऊन आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. परीक्षा प्रश्नपत्रिका फुटीच्या घटना, उत्तरपत्रिका मूल्यमापनातील त्रुटी आणि युवकांमधील बेरोजगारी या मुद्द्यांवर संघटना आक्रमक भूमिका घेत असल्याचे त्यांनी सांगितले.

अमेरिकेत वास्तव्यास असलेल्या अभिजित दीपके याने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वरून तरुणांना दिल्लीतील शांततापूर्ण आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू करण्यात आलेल्या ऑनलाइन याचिकेला जवळपास आठ लाख विद्यार्थ्यांचा पाठिंबा मिळाल्याचा दावा त्यांनी केला आहे.

गेल्या काही दिवसांत सीजेपीची सोशल मीडियावर मोठी चर्चा झाली असून, बेरोजगारी, महागाई, शिक्षण व्यवस्था आणि युवकांच्या प्रश्नांवर संघटना सातत्याने भूमिका मांडत आहे. भारतातील युवा या मुद्द्यांना व्यापक प्रतिसाद देत आहे.

दीपके यांनी भारतात परतल्यानंतर अटकेची शक्यता असल्याची भीती आपल्या कुटुंबीयांनी व्यक्त केल्याचे सांगितले. तसेच संघटनेचे 'एक्स' खाते बंद करण्यात आल्याचा आणि इन्स्टाग्राम पेज हॅक झाल्याचा आरोपही त्यांनी केला.

### राज्यातील ५६ लाख शेतकरी बांधवांना दिलासा

# शेतकरी कर्जमाफीला मंत्रिमंडळाची मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या प्रतीक्षेचा अखेर अंत झाला असून राज्य मंत्रिमंडळाने शेतकरी कर्जमाफी योजनेला मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. मात्र, विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने या निर्णयाची अधिकृत घोषणा सध्या करण्यात येणार नसल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.



सरकारच्या प्रस्तावित पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतचे पीककर्ज माफ करण्यात येणार आहे. तसेच नियमितपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्यात येणार आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री फडणवीस यांनी कर्जमाफीची घोषणा केली होती. त्यानंतर स्थापन करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल सरकारकडे सादर केला. या अहवालाच्या आधारे मंत्रिमंडळाने योजनेला अंतिम मंजुरी दिली. या निर्णयामुळे राज्यातील सुमारे ६५ लाख कर्जखात्यांना लाभ मिळणार असून कर्जमाफीची एकूण रक्कम ३६ हजार ५८५ कोटी रुपये इतकी असणार आहे. याचा थेट फायदा ५६ लाख शेतकऱ्यांना होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, कर्जमाफीसंदर्भातील सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यात येत आहे. मात्र, निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार आचारसंहितेच्या कालावधीत या निर्णयाची सार्वजनिक घोषणा करता येणार नाही. त्यामुळे विधान परिषद निवडणुकीनंतर योजनेची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. सहकार विभागाकडून लवकरच योजनेच्या अटी व शर्तींबाबत स्वतंत्र परिपत्रक जारी करण्यात येणार आहे. त्यानंतर लाभार्थी पात्रता, अर्ज प्रक्रिया आणि अंमलबजावणीची रूपरेषा स्पष्ट होणार आहे.

याचवेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी लाडकी बहीण योजनेबाबत सुरू असलेल्या चर्चांवरही स्पष्टीकरण दिले. योजनेतून कोणत्याही पात्र महिलेला वगळण्यात आलेले नसल्याचे त्यांनी सांगितले. ज्या लाभार्थ्यांनी ई-केवायसी पूर्ण केलेले नाही, त्यांचे हप्ते तात्पुरते थांबविण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. सुमारे १४ हजार पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे आढळून आले आहे. तसेच काही सरकारी कर्मचारी, आयकरदाते आणि इतर अपात्र लाभार्थ्यांनीही योजनेतून निधी घेतल्याचे समोर आले आहे. अपात्र महिलांकडून रक्कम परत घेतली जाणार नसली तरी पुरुष लाभार्थ्यांकडून घेतलेली रक्कम वसूल केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

### प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळांविरोधात दिल्लीत तक्रारी

# महाराष्ट्र काँग्रेसमध्ये अंतर्गत नाराजीत वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्र काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा उफाळून आले असून प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या कार्यपद्धतीविरोधात पक्षातील नाराज गटाने मोर्चेबांधणी सुरू केल्याची माहिती समोर आली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, पक्षातील काही आमदार आणि ज्येष्ठ पदाधिकारी ८ जून रोजी नवी दिल्लीत काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाची भेट घेऊन प्रदेशाध्यक्षपदाच्या नेतृत्वाबाबत नाराजी व्यक्त करणार आहेत.



माहितीनुसार, या शिष्टमंडळात काँग्रेसचे चार ते पाच विद्यमान आमदार तसेच काही ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांचा समावेश असण्याची शक्यता आहे. हे नेते काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांची भेट घेण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले जात आहे. पक्षातील नाराजीचे प्रमुख कारण म्हणून अलीकडेच राबविण्यात आलेल्या 'संघटन सृजन अभियान'चा उल्लेख केला जात आहे. या अभियानांतर्गत राज्यभरात शहराध्यक्ष आणि जिल्हाध्यक्षांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. मात्र, या नियुक्त्यांमध्ये स्थानिक नेतृत्वाला आणि वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेण्यात आले नसल्याचा आरोप नाराज गटाकडून करण्यात येत आहे. काँग्रेसमधील काही प्रभावशाली नेत्यांचाही या नाराज गटाला अप्रत्यक्ष पाठिंबा असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. त्यामुळे हा वाद केवळ संघटनात्मक मतभेदांपुरता मर्यादित न राहता पक्षातील नेतृत्वाच्या प्रश्नापर्यंत पोहोचण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या संदर्भात काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाकडून किंवा प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. ८ जून रोजी प्रस्तावित बैठकीनंतर या घडामोडींवर अधिक स्पष्टता येण्याची शक्यता आहे.

### अमित शाह त्रिपुरा दौऱ्यावर

**आगरतळा :** त्रिपुराचे मुख्यमंत्री माणिक साहा यांनी मंगळवारी सांगितले की, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह ४ जूनपासून दोन दिवसांच्या त्रिपुरा राज्य दौऱ्यावर येणार असून, या दौऱ्यात ते एका हॉटेलची पायाभरणी करतील आणि बांगलादेश सीमेची पाहणी करतील. मेघालयातील शिलाँग येथे होणाऱ्या नॉर्थ ईस्टर्न कौन्सिलच्या (एनईसी) पूर्ण अधिवेशनाला उपस्थित राहिल्यानंतर शाह येथे येतील, असे त्यांनी सांगितले. अमित शाह ४ जून रोजी येथे येतील. दुसऱ्या दिवशी ते ताज पुष्पबंता पॅलेस हॉटेलची पायाभरणी करतील, तसेत सीमेची पाहणी करतील, असे त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# अवैध दारू धंद्यांवर धडक कारवाई

### ५ दिवसांत ४० लाखांचा मुद्देमाल जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** शहर आणि परिसरातून सर्व प्रकारच्या अवैध दारू धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी कंबर कसली आहे. पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या आदेशानुसार शहरात गावठी हातभट्टी आणि बेकायदेशीर दारू विक्री करणाऱ्यांविरोधात एक व्यापक आणि तीव्र मोहीम हाती घेण्यात आली आहे.

या विशेष मोहिमेअंतर्गत गेल्या अवघ्या पाच दिवसांत पोलिसांनी तब्बल ४० लाख रुपयांपेक्षा अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करत दारू माफियांना मोठा इशारा दिला आहे.

पोलीस आयुक्तांनी हद्दीतील सर्व पोलीस ठाण्यांना आणि गुन्हे शाखेला अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार २८ मे ते १ जून २०२६ या कालावधीत शहरात ठिकठिकाणी छापे टाकण्यात आले. या पाच दिवसांत पोलिसांनी एकूण १६१ गुन्हे दाखल केले असून १७० आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे. या संपूर्ण कारवाई दरम्यान ५२ हजार २०९ लीटर गावठी दारू आणि रसायन जप्त करून नष्ट करण्यात आले आहे, ज्याची एकूण किंमत ४० लाख ५ हजार ५३६ रुपये आहे.

यामध्ये नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण करणाऱ्या अपायकारक पदार्थांची निर्मिती केल्याप्रकरणी 'भारतीय न्याय संहिता' कलम १२३ आणि दारूबंदी कायद्यान्वये १० गुन्हे दाखल करून १० आरोपींना अटक करण्यात आली.

त्यांच्याकडून ११ लाख २१ हजार रुपयांची १,१४० लीटर दारू जप्त करण्यात आली. याशिवाय, गावठी दारू तयार करणाऱ्या हातभट्ट्यांवर थेट धाडी टाकून ९ लाख २९ हजार रुपयांचे २२ हजार लीटरपेक्षा जास्त रसायन जागेवरच नष्ट करण्यात आले.

### सर्वसामान्यांच्या बजेटवर होणार परिणाम

# पेट्रोल-डिझेल दरवाढीमुळे महागाईचा भडका?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किंमतींमुळे सर्वसामान्य नागरिकांना महागाईचा आणखी एक फटका बसण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. रेटिंग एजन्सी क्रिसिलच्या अहवालानुसार, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती उच्च पातळीवर कायम राहिल्यास इंधन दरांमध्ये आणखी वाढ होऊ शकते. याचा थेट परिणाम वाहतूक खर्चावर होऊन दैनंदिन वापराच्या अनेक वस्तू महाग होण्याची शक्यता आहे. क्रिसिलच्या अंदाजानुसार, १५ मेनंतर पेट्रोल आणि डिझेलच्या



दरात प्रतिलिटर सुमारे ७.५ रुपयांची वाढ झाली आहे. कच्च्या तेलाच्या किंमतींमध्ये वाढ कायम राहिल्यास ही दरवाढ १० रुपयांपर्यंत पोहोचू शकते. इंधन दरवाढीचा सर्वाधिक परिणाम महागाईवर होत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. भारतातील सुमारे ७१ टक्के मालवाहतूक रस्ते मार्गाने होत असल्याने डिझेलचे दर वाढल्यास वाहतूक खर्चात वाढ होते. परिणामी वस्तूंच्या किरकोळ किंमती वाढण्याची शक्यता निर्माण होते. क्रिसिलच्या मते, इंधनाच्या दरात ७.५ रुपयांची वाढ झाल्यास किरकोळ महागाई दरात सुमारे ०.३६ टक्क्यांची वाढ होऊ शकते. दरवाढ १० रुपयांपर्यंत गेल्यास महागाईत जवळपास ०.४८ टक्क्यांची भर पडू शकते. वाहतूक खर्च वाढल्यामुळे दूध, फळे, भाज्या, डाळी, चहा, कॉफी, मसाले, अंडी, मांस आणि मासे यांसारख्या दैनंदिन वापरातील वस्तूंच्या किंमती वाढण्याची शक्यता आहे. याशिवाय कपडे, ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स, लाकडी उत्पादने, सिमेंट, सिरेमिक आणि बांधकाम साहित्याच्या किमतींवरही परिणाम होऊ शकतो. रसायन, कोळसा आणि धातू उद्योगांनाही इंधन दरवाढीचा फटका बसण्याची शक्यता आहे. उत्पादन खर्च वाढल्याने कंपन्या हा अतिरिक्त भार ग्राहकांवर टाकू शकतात. काही उद्योग उत्पादनात कपात करून खर्च नियंत्रित ठेवण्याचाही प्रयत्न करू शकतात. अहवालानुसार, चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यांत कच्च्या तेलाची सरासरी किंमत ११२ डॉलर प्रति बॅरल इतकी राहिली आहे. ही किंमत संपूर्ण वर्षासाठी गृहीत धरलेल्या ९५ डॉलर प्रति बॅरलच्या अंदाजापेक्षा लक्षणीयरीत्या अधिक आहे. त्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतींवर आणखी दबाव वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. याशिवाय, कमकुवत मान्सून, एल निनोचा संभाव्य प्रभाव आणि कृषी उत्पादनातील घट यांमुळे अन्नधान्य महागाई वाढण्याचीही भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आगामी काळात महागाईची स्थिती कशी राहते याकडे भारतीय रिझर्व्ह बँक बारकाईने लक्ष ठेवून आहे. तज्ज्ञांच्या मते, इंधन दरवाढीचा परिणाम केवळ वाहनधारकांपुरता मर्यादित राहत नाही. वाहतूक, उत्पादन आणि वितरण खर्च वाढल्यामुळे जवळपास सर्वच वस्तूंच्या किमतींवर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे येत्या काही महिन्यांत सर्वसामान्यांच्या घरगुती बजेटवर महागाईचा अतिरिक्त ताण पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## टीएमसीमध्ये फुटीच्या चर्चांना आले उधाण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी पक्षाचा पराभव झाल्यानंतर तृणमूल काँग्रेस अंतर्गत अस्वस्थता वाढल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. पक्षाच्या ८० आमदारांपैकी सुमारे ५० आमदार वेगळा गट स्थापन करण्याच्या तयारीत असल्याचा दावा केला जात असून, या संभाव्य बंडामुळे पक्षाच्या अस्तित्वाबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

या चर्चेला चालना देणारी घटना म्हणजे विरोधी पक्षनेत्याच्या नियुक्तीशी संबंधित कथित बनावट सह्यांच्या वादानंतर पक्षाने आमदार ऋतब्रता बॅनर्जी आणि संदीपान साहा यांना पक्षातून निष्कासित करण्याचा घेतलेला निर्णय. या कारवाईनंतर पक्षातील नाराजी अधिक तीव्र झाल्याचे सांगितले जात आहे. ऋतब्रता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील कथित बंडखोर गटाने पक्षप्रमुख ममता बॅनर्जी यांच्या कार्यक्रमांपासून अंतर ठेवण्यास सुरुवात केली आहे. कोलकाता येथे झालेल्या आंदोलनातही पक्षाचे बहुतांश आमदार अनुपस्थित राहिल्याची चर्चा आहे. या कार्यक्रमाला केवळ सहा आमदार आणि तीन खासदार उपस्थित होते. बंडखोरांच्या गुप्त बैठका सुरू असल्याचे वृत्त असून, त्यामुळे पक्षांतर्गत फुटीच्या शक्यतांबाबतच्या चर्चांना आणखी बळ मिळाले आहे. काही राजकीय विश्लेषक पश्चिम बंगालमधील या घडामोडींची तुलना महाराष्ट्रातील शिवसेना फुटीशी करत आहेत.

## संपादकीय

# जनादेशाच्या आडून सूडाचे राजकारण



**पश्चिम बंगालमधील सत्तांतरानंतर उसळलेला राजकीय हिंसाचार आणि तृणमूल काँग्रेसचे नेते अभिषेक बॅनर्जी यांच्यावर सोनारपूर येथे झालेला अमानुष हल्ला हा लोकशाही मूल्यांचा घोर पराभव आहे. कोणत्याही पक्षाचा विजय असो वा पराभव, पराभूत विरोधकांना शारीरिकदृष्ट्या लक्ष्य करण्याची ही हिंसक प्रवृत्ती अत्यंत चिंताजनक आणि निषेधार्ह आहे.**

पश्चिम बंगालच्या राजकारणाला लागलेले हिंसेचे ग्रहण वर्षानुवर्षे सुटायला तयार नाही, हेच २०२६ मधील विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. नुकत्याच झालेल्या ऐतिहासिक सत्तांतरानंतर राज्यात शांतता प्रस्थापित होईल, अशी आशा होती; परंतु प्रत्यक्षात याउलट परिस्थिती निर्माण झाली आहे. तृणमूल काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील सोनारपूर येथे झालेला हल्ला ही या रक्तरंजित परंपरेची ताजी आणि अत्यंत धक्कादायक कडी आहे. निवडणूक संपून नवे सरकार अस्तित्वात आले तरी बंगालमधील सूडाचे आणि हिंसेचे राजकारण थांबलेले नाही, हेच या घटनेवरून स्पष्ट होते. लोकशाहीत जनतेचा कौल शिरसावंद्य मानून पुढे जाणे अपेक्षित असते, मात्र बंगालमध्ये सत्ता बदलली तरी हिंसेची भयावह संस्कृती तशीच जिवंत राहिली आहे, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. सोनारपूर येथे घडलेली घटना कोणत्याही सुसंस्कृत समाजाला मान खाली घालायला लावणारी आहे. निवडणुकीनंतर झालेल्या हिंसाचारात मारल्या गेलेल्या आपल्या पक्ष कार्यकर्त्यांच्या कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी अभिषेक बॅनर्जी तेथे गेले होते. मात्र, एका लोकप्रतिनिधीला आणि प्रमुख विरोधी नेत्याला स्थानिक जमावाने ज्या प्रकारे घेरले, ते कायदा-सुव्यवस्थेचे धिंडवडे काढणारे आहे. त्यांच्या ताफ्यावर दगड, अंडी आणि जोडे फेकण्यात आले. इतकेच नव्हे, तर त्यांच्याशी झोंबाझोंबी करून त्यांचे कपडे फाडण्यात आले आणि चष्मा तोडला गेला. सुदैवाने त्यांनी हेल्मेट घातलेले असल्याने ते मोठ्या दुखापतीपासून वाचले. "त्यांना मला जीवे मारायचे होते," हे अभिषेक बॅनर्जी यांचे विधान या हल्ल्याची भीषणता दर्शवते. या पाठोपाठ हुगळीत तृणमूलचे दुसरे खासदार कल्याण बॅनर्जी यांच्यावरही झालेला हल्ला ही निव्वळ योगायोग नसून विरोधकांना जरब बसवण्याचा संघटित प्रयत्न असल्याचे अधोरेखित करतो. या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगालमधील सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील आरोप-प्रत्यारोपांची जुनीच मालिका पुन्हा सुरू झाली आहे. तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी या हल्ल्यांमागे थेट सत्ताधारी पक्षाचा आणि त्यांच्या कार्यकर्त्यांचा हात असल्याचा आरोप केला आहे, तर नव्याने सत्तेत आलेल्या पक्षाने याला स्थानिक जनतेचा संताप आणि अंतर्गत गटबाजीचे नाव दिले आहे. भूतकाळात जेव्हा तृणमूल काँग्रेस सत्तेत होती, तेव्हा विरोधी कार्यकर्त्यांवर अशाच प्रकारचे हल्ले होत असल्याच्या तक्रारी वारंवार येत होत्या. आज सत्ता बदलल्यानंतर तीच हिंसक पद्धत तृणमूलच्या नेत्यांविरुद्ध वापरली जात आहे. एका हिंसेचे उत्तर दुसऱ्या हिंसेने देणे ही लोकशाही असूच शकत नाही. पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांनी केलेल्या चुकांचे भांडवल करून नवीन सत्ताधाऱ्यांना आपल्या राज्यातील विरोधी पक्षाच्या नेत्यांना अशी असुरक्षितता देणे कोणत्याही प्रकारे न्याय्य ठरत नाही. या संपूर्ण प्रकरणात सर्वाधिक संशयास्पद आणि चिंताजनक भूमिका राहिली आहे ती स्थानिक पोलीस आणि प्रशासनाची. अभिषेक बॅनर्जी यांच्यासारख्या राष्ट्रीय पातळीवरील नेत्याच्या दौऱ्यादरम्यान पोलिसांची पुरेशी उपस्थिती नसावी, ही मोठी सुरक्षा त्रुटी आहे. बंगालमधील हे हिंसेचे दुष्टचक्र थांबवायचे असेल, तर नवीन सरकारला पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन कठोर पावले उचलावी लागतील. केंद्रीय गृह मंत्रालयाने आणि कलकत्ता उच्च न्यायालयाने यात त्वरित हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. निवडणुका येतात आणि जातात, सरकारे बदलतात, परंतु मानवी जीवनाचे मूल्य आणि लोकशाहीची प्रतिष्ठा अबाधित राहिली पाहिजे. जर पराभूत पक्षाच्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना सातत्याने लक्ष्य केले गेले, तर राज्यामध्ये अराजकता माजण्यास वेळ लागणार नाही. नवीन गृह मंत्रालयाने गुन्हेगारांचा कोणताही राजकीय रंग न पाहता त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई केली पाहिजे, तरच बंगालमधील या रक्तरंजित संस्कृतीला मूठमाती देता येईल. अन्यथा, हा नवा जनादेश केवळ एका नव्या हुकूमशाहीची आणि अराजकतेची सुरुवात ठरेल, यात शंका नाही.

# अल्गोरिदमच्या साखळदंडातील आधुनिक गुलामगिरी

**» गिग अर्थव्यवस्थेतील स्वातंत्र्याचे आमिष हे नव्या स्वरूपातील गुलामगिरीचेच आधुनिक रूप. अल्गोरिदमच्या जाळ्यात अडकलेल्या या कामगारांना शोषणातून मुक्त करण्यासाठी कायदेशीर संरक्षणाची नितांत आवश्यकता आहे.**




तंत्रज्ञानाच्या झगमगाटात आणि 'डिजिटल इंडिया'च्या स्वप्नाळू वातावरणात एक नवा कामगार वर्ग अत्यंत वेगाने आकाराला आला आहे. या वर्गाला गोंडस भाषेत 'गिग वर्कर' म्हटले जाते. 'स्वतःचे मालक स्वतः बना' आणि 'कामाच्या लवचिक वेळा' अशा आकर्षक जाहिरातींना भुलून लाखो तरुण या नव्या अर्थव्यवस्थेचा भाग बनले. परंतु, जसजसा काळ पुढे सरकत आहे, तसतसा या 'स्वातंत्र्या'चा बुरखा टराटरा फाटू लागला आहे. आजमितीस भारतात सुमारे ८० लाखांहून अधिक गिग कामगार या क्षेत्रात राबत आहेत आणि आगामी दशकात हा आकडा तिप्पट होण्याची शक्यता नीती आयोगानेच वर्तवली आहे.

या नव्या व्यवस्थेचे सर्वांत भयानक रूप म्हणजे अदृश्य मालक. पूर्वीच्या काळी कारखान्यात एखादा जाचक मुकादम किंवा व्यवस्थापक असायचा, ज्याच्याशी किमान वाद तरी घालता यायचा; त्याच्यात थोडीफार मानवी संवेदना असायची. आता या 'मुकादमा'ची जागा एका निर्दयी 'अल्गोरिदम'ने घेतली आहे. ओला, उबर, स्विगी किंवा झोमॅटो यांसारख्या प्लॅटफॉर्म कंपन्यांचे ॲप हेच या कामगारांचे सर्वस्व असते. हे ॲप कधीही थकवा जाणवत नसलेले आणि मानवी भावना नसलेले एक अमानवीय यंत्र आहे. या यंत्राने 'गेमिफिकेशन'च्या माध्यमातून कामगारांचे जगणेच एका भयानक खेळात रूपांतरित केले आहे. जास्त डिलिव्हरी केल्यास जास्त इन्सेंटिव्ह, फाईव्ह स्टार रेटिंगचा सततचा दबाव आणि वेळेत न पोहोचल्यास थेट दंडाचा बडगा, या चक्रव्यूहात अडकलेला तरुण दिवसाचे बारा-चौदा तास रस्त्यावर अक्षरशः स्वतःला गाडून घेतो. या ताणामुळे कामगारांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. या व्यवस्थेने माणसाला केवळ एक 'डेटा पॉइंट' बनवून सोडले आहे, ज्याला आजारी पडण्याची किंवा सुट्टी घेण्याची कोणतीही मुभा नाही.

सर्वांत मोठा विरोधाभास म्हणजे या कंपन्या कामगारांना 'कर्मचारी' न मानता आपले 'भागीदार' म्हणतात. हा केवळ शब्दांचा खेळ नाही, तर कामगार कायद्यांमधील जबाबदाऱ्या झटकण्याचा एक अत्यंत धूर्त आणि थंड डोक्याने आखलेला कट आहे. कर्मचारी म्हटल्यास त्यांना किमान वेतन, भविष्य निर्वाह निधी, आरोग्य विमा, पगारी रजा आणि कामाचे निश्चित तास यांसारख्या मूलभूत सुविधा द्याव्या लागतील. 'भागीदार' या गोंडस नावाखाली त्यांना या सर्व सामाजिक सुरक्षेपासून पद्धतशीरपणे वंचित ठेवले जाते. ट्रॅफिकमध्ये जीव धोक्यात घालून अवघ्या दहा मिनिटांत किराणा किंवा जेवण पोहोचवताना अपघात झाला, तर उपचाराचा खर्च त्या 'भागीदाराला'च स्वतःच्या खिशातून करावा लागतो; त्यात कंपनीचा कोणताही वाटा नसतो. हा नफेखोरीचा अत्यंत गळेकापू आणि विद्रूप चेहरा आहे.

जागतिक स्तरावर या शोषणाविरुद्ध आता आवाज उठू लागला आहे. युरोपीय देशांमध्ये आणि अमेरिकेतील काही राज्यांत न्यायालयांनी या कंपन्यांना चपराक लगावत गिग कामगारांना 'कर्मचारी' म्हणून मान्यता देण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. युरोपियन युनियनने तर 'प्लॅटफॉर्म वर्क डायरेक्टिव्ह' आणून या कामगारांना किमान हक्क मिळवून देण्याच्या दिशेने ठोस पावले उचलली आहेत. आपल्याकडे मात्र राजस्थानसारख्या राज्याने 'गिग वर्कर कायदा' आणण्याचा केलेला एक अपवाद वगळता, देशभरात सर्वत्र प्रशासकीय उदासीनता आणि धोरणलकवाच पाहायला मिळतो.

या शोषणात आपण, म्हणजे मध्यमवर्गीय ग्राहकही तितकेच जबाबदार आहोत, हे कटू सत्य मान्य करावेच लागेल. स्मार्टफोनच्या एका क्लिकवर आपल्याला सर्व काही दारात हवे असते. दहा मिनिटांत जेवण किंवा किराणा न आल्यास आपण रागाने कस्टमर केअरला फोन करतो किंवा त्या डिलिव्हरी बॉयचे रेटिंग कमी करतो. आपल्या वेळेच्या बचतीसाठी आणि सुविधेसाठी आपण एका मजुराच्या घामाची आणि सुरक्षिततेची किती निर्दयीपणे किंमत मोजत आहोत, याचे भान समाज म्हणून आपण हरपून बसलो आहोत.

गिग अर्थव्यवस्था ही आजच्या काळाची गरज असली आणि ती तंत्रज्ञानातील एक मोठी झेप असली, तरी ती बेबंद आणि नियमनमुक्त असू शकत नाही. कामगारांच्या लवचिकतेचा अर्थ त्यांच्या जिवाशी आणि आरोग्याशी खेळण्याचा परवाना असा मुळीच होत नाही. या 'डिजिटल मजुरांना' कायदेशीर संरक्षण देण्याची आणि त्यांच्या शोषणाला वेसण घालण्याची थेट जबाबदारी आता शासनाची आहे. अल्गोरिदमच्या अदृश्य साखळदंडातून या आधुनिक गुलामांची मुक्तता करण्यासाठी केवळ कागदी आश्वासने किंवा सहानुभूतीचे दोन शब्द पुरेसे नाहीत, तर व्यवस्थेच्या मुळावर घाव घालणाऱ्या कठोर कायद्यांची नितांत आवश्यकता आहे. जर वेळीच पावले उचलली नाहीत, तर भारताच्या तथाकथित आर्थिक महासत्तेच्या झगमगत्या इमारतीचा पाया या शोषितांच्या अश्रूंनीच कमकुवत होईल, यात शंका नाही.

# पावसाळ्यापूर्वीच्या कामांना पालिकेने दिला वेग

## नालेसफाई, अतिक्रमण व पालखी मार्ग व्यवस्थेचा आयुक्तांकडून आढावा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**



**पिंपरी :** आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील नालेसफाई, अतिक्रमण निर्मूलन, स्वच्छतागृहांचे आधुनिकीकरण, वृक्षारोपण, हॉकर्स व्यवस्थापन, पालखी मार्गाची तयारी आणि अग्निसुरक्षा व्यवस्थेचा सविस्तर आढावा महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी घेतला. पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात झालेल्या बैठकीत विविध विभागांच्या कामांचा आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

यावेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सहशहर अभियंते बापूसाहेब गायकवाड, अजय सूर्यवंशी, मनोज सेठिया, उपआयुक्त सचिन पवार, डॉ. प्रदीप ठेंगल, संदीप खोत, सीताराम बहुरे, राजेश आगळे, व्यंकटेश दुर्वास यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी शहरातील नाल्यांचा नैसर्गिक प्रवाह सुरळीत राहण्यासाठी नालेसफाईची कामे प्रभावीपणे पूर्ण करण्याचे निर्देश दिले. ज्या ठिकाणी कामे पूर्ण झाली आहेत, तेथील नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी करून गुणवत्ता, रुंदी, खोली आणि पाणी वाहून नेण्याच्या क्षमतेचा अहवाल सादर करण्यास सांगितले. अतिक्रमण हटविल्यानंतर त्याच ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी क्षेत्रीय कार्यालयांनी सातत्याने निरीक्षण ठेवावे, असे निर्देश देण्यात आले. तसेच फेरीवाल्यांसाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय हॉकर्स झोन निश्चित करून त्यांना अधिकृत जागा उपलब्ध करून देण्याच्या प्रक्रियेला गती देण्याचे आदेश देण्यात आले.

शहरातील सार्वजनिक ठिकाणी वारंवार कचरा टाकल्या जाणाऱ्या जागांची ओळख पटवून तेथे सुशोभीकरण, हरितीकरण आणि वृक्षारोपण करण्यावर भर देण्यात आला. तसेच अनधिकृत फ्लेक्स, जाहिरात फलक आणि बेकायदेशीर जाहिरातींवर नियमित कारवाई करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. महापालिकेकडून स्वतंत्र 'टॉयलेट पॉलिसी' तयार करण्यात येत असून त्यासाठी सुरू असलेले सार्वजनिक स्वच्छतागृहांचे सर्वेक्षण अचूकपणे करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. जीर्ण स्वच्छतागृहांच्या ठिकाणी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात यावा, तसेच महिलांसाठी बसविलेल्या सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशिन्स नियमित कार्यरत असल्याची खातरजमा करण्यास सांगितले.

शहरातील प्रमुख रस्त्यांवरील दुभाजकांमध्ये पर्यावरणपूरक वृक्ष लागवड करण्याबरोबरच महापालिकेच्या मोकळ्या जागांवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण मोहीम राबविण्यासाठी सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि नागरिकांचा सहभाग वाढविण्याचे आवाहन करण्यात आले. पावसाळ्यात पाणी साचण्याची किंवा पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असलेल्या संवेदनशील भागांतील सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित असल्याची खात्री करण्याचे निर्देश देण्यात आले. आपत्कालीन परिस्थितीत त्वरित निर्णय घेण्यासाठी ही यंत्रणा सक्षम असणे आवश्यक असल्याचे आयुक्तांनी नमूद केले.

# जनगणनेसाठी निकृष्ट साहित्यामुळे प्रगणकांमध्ये नाराजी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** जनगणना सर्वेक्षणासाठी नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षक व प्रगणकांना शासनाकडून पुरविण्यात आलेल्या साहित्याच्या निकृष्ट दर्जामुळे तसेच प्रशासकीय अनास्थेमुळे असंतोष निर्माण झाला आहे. राष्ट्रीय कर्तव्य पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्यांना अपेक्षित सुविधा न मिळाल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

जनगणनेसाठी प्रगणकांना दोन पेन, दोन पेन्सिल, पॅड, एक मार्कर पेन, टोपी आणि साहित्य ठेवण्यासाठी पिशवी असे साहित्य देण्यात आले आहे. मात्र अनेक शिक्षकांना केवळ पेन, पेन्सिल आणि मार्कर इतकेच साहित्य मिळाल्याचे समोर आले आहे. आवश्यक साहित्याच्या वितरणात तफावत असल्याने कामकाजावर परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.

घरांवर क्रमांक टाकण्यासाठी वापरण्यात येणारे मार्कर पेन काही तासांतच सुकत असून त्यांची शाई फिकट पडत असल्याची तक्रार प्रगणकांनी केली आहे. दोन ते तीन घरांनंतरच मार्कर निष्क्रिय होत असल्याने अनेकांना स्वतःच्या खर्चाने नवीन साहित्य खरेदी करावे लागत आहे.

दरम्यान, उन्हाळी सुट्ट्यांमुळे अनेक घरे बंद असल्याने माहिती संकलनात अडथळे निर्माण होत आहेत. काही कुटुंबे बाहेरगावी गेल्याने पुन्हा पुन्हा गृहभेटी द्याव्या लागत आहेत. वाढत्या तापमानाचा त्रासही प्रगणकांना सहन करावा लागत आहे.

# विचार प्रबोधन पर्वाला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**



**पिंपरी :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड शहरात आयोजित कार्यक्रमात 'पुण्यश्लोक' या भव्य महानाट्याद्वारे त्यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाचे आणि कर्तृत्वाचे प्रभावी दर्शन घडविण्यात आले. दूरदर्शी नेतृत्व, प्रजेप्रती अपार बांधिलकी, धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन आणि केलेले कार्य यांचे जिवंत चित्रण या महानाट्यातून उलगडले.

येथील नटसम्राट निळू फुले रंगमंदिरात झालेल्या या कार्यक्रमाला हजारो नागरिकांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रारंभी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा विजय असो' अशा घोषणांनी नाट्यगृह दुमदुमून गेले. पारंपरिक ढोलपथक, धनगरी नृत्य तसेच पिंगळा आणि वासुदेव या लोककलाकारांच्या सादरीकरणातून इतिहासातील विविध प्रसंग रंगमंचावर साकारण्यात आले. प्रत्येक प्रसंगाला प्रेक्षकांकडून टाळ्यांचा कडकडाट मिळाला.

कार्यक्रमाची सुरुवात आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी माऊली जगताप, विजय भोजने, प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पीसीएमसी वतीने आयोजित या महानाट्यात सुमारे ७५ कलाकारांनी सहभाग घेतला. अभिनय, भव्य नेपथ्य, प्रभावी प्रकाशयोजना आणि भावस्पर्शी संगीत यांच्या संगमातून साकारलेल्या या सादरीकरणाने प्रेक्षकांना इतिहासाच्या सुवर्णपानांत नेणारा अनुभव दिला. या कार्यक्रमात अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरवपूर्ण इतिहास उलगडण्यात आला. न्यायप्रियता, लोककल्याण आणि सक्षम प्रशासन या मूल्यांचा ठसा अधोरेखित करत त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील करुणा, धैर्य आणि कर्तृत्वाचे दर्शन विविध प्रसंगांतून घडले. भूपाळी, वासुदेव, पिंगळा, वाघ्या-मुरळी, धनगरी नृत्य, शाहिरी पोवाडे तसेच आदिवासी आणि डोंबारी कला सादरीकरणातून प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. शाहिरी कार्यक्रमातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा आणि विचारांचा जागर करण्यात आला. या सर्व उपक्रमांतून लोककला, इतिहास आणि सांस्कृतिक वारसा यांचा समृद्ध संगम अनुभवण्याची संधी नागरिकांना मिळाली.

# हिंजवडीत नोकरीच्या आमिषाने ११.२५ लाखांची फसवणूक

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**




**पिंपरी :** हिंजवडी परिसरात नोकरी आणि प्रशिक्षण देण्याचे आमिष दाखवून उमेदवारांकडून लाखो रुपये उकळल्याप्रकरणी एका खासगी कंपनीच्या सीईओसह तिघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी हिंजवडी पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३७१/२०२६ नोंद करण्यात आला आहे.

याप्रकरणी सौरव राजन नायर (वय २५, रा. देहूरोड, ता. हवेली) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार हर्षल भानुदास ठाकरे, जुविल पारख, सौम्या सिंग तसेच थिनटेक टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीतील इतर संबंधित व्यक्तींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२), ३१८(४) आणि ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सप्टेंबर २०२५ ते आतापर्यंतच्या कालावधीत हिंजवडी फेज-२ येथील इम्पेरियम राइज इमारतीतील कंपनीच्या कार्यालयात आरोपींनी संगनमताने अनेक उमेदवारांना नोकरी व प्रशिक्षणाचे आश्वासन दिले. त्यासाठी प्रत्येक उमेदवाराकडून १५ हजार रुपये प्रशिक्षण शुल्क आकारण्यात आले. त्यानंतर उमेदवारांना प्रशिक्षण देऊन त्यांच्याकडून काम करून घेण्यात आले. मात्र, काही काळानंतर विविध कारणे देत त्यांना नोकरीतून कमी करण्यात आले. तसेच दोन महिन्यांचा पगार आणि प्रशिक्षणासाठी भरलेली रक्कम परत न देता आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या प्रकारात एकूण ११ लाख २५ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे फिर्यादीने नमूद केले आहे. नोकरीच्या नावाखाली युवकांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून पैसे उकळल्याचा आरोप असून या प्रकरणाचा तपास सुरू आहे. हिंजवडी पोलिसांनी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपासादरम्यान आणखी काही फसवणुकीची प्रकरणे उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### भरधाव दुचाकीचा भीषण अपघात

**पिंपरी :** नवी सांगवी परिसरात भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालवलेल्या दुचाकीच्या अपघातात एका २२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. या प्रकरणी दुचाकी चालकाविरोधात सांगवी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही दुर्घटना ३१ मे रोजी मध्यरात्री सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास मनोहर पेरेकर अंडरपासजवळील सुदर्शन चौक येथे घडली. याप्रकरणी प्रज्वल प्रशांत शिंदे (वय २२, रा. धानोरी) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आकाश रंजन कदम (वय २४, रा. पिंपरी) हा एमएच-१४-जीयू-४१०८ क्रमांकाची दुचाकी भरधाव वेगाने व वाहतूक नियमांचे उल्लंघन करून चालवत होता. वेगावरील नियंत्रण सुटल्याने दुचाकी डिव्हायडरवर जाऊन धडकली. या अपघातात दुचाकीच्या मागील सीटवर बसलेला अमन आयाज शेख (वय २२, रा. वल्लभनगर, पिंपरी-चिंचवड) गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

या प्रकरणी सांगवी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अद्याप आरोपीला अटक करण्यात आलेली नसून पुढील तपास सुरू आहे.

### आमिष दाखवल्याप्रकरणी महिलेविरुद्ध गुन्हा

**पिंपरी :** देहूफाटा परिसरात सार्वजनिक ठिकाणी उभे राहून ग्राहकांना आमिष दाखवत वेश्याव्यवसायासाठी प्रवृत्त केल्याप्रकरणी एका महिलेविरुद्ध दिघी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिघी पोलिस ठाण्यात हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा प्रकार १ जून २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ४.४५ वाजण्याच्या सुमारास देहूफाटा येथील मोरे वडापावसमोरील सार्वजनिक रस्त्यावर घडला. याप्रकरणी पोलीस कर्मचारी सोमनाथ बाळू खळसोडे (वय ३८) यांनी फिर्याद दिली आहे.

# तरुणावर लाकडी दांडक्याने हल्ला

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** चिंचवड परिसरात किरकोळ वादातून एका तरुणावर लाकडी दांडक्याने हल्ला करून त्याला जखमी केल्याची घटना समोर आली आहे. तसेच आरोपीने दुचाकी, टीव्ही आणि घरातील इतर साहित्याची तोडफोड केल्याप्रकरणी चिंचवड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना २७ मे रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास वाल्हेकरवाडी येथील राजयोग पेट्रोल पंपाजवळील सावित्रीबाई कॉलनी परिसरात घडली. याप्रकरणी बाळू सोनाजी इंगळे (वय २८, रा. वाल्हेकरवाडी, चिंचवड) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आकाश शरद मोरे (वय २६, रा. वाल्हेकरवाडी, चिंचवड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी फिर्यादीच्या भावाची मोटारसायकल फोडत होता. त्याला विरोध केल्यानंतर आरोपी संतापला यानंतर आरोपीने लाकडी दांडक्याने फिर्यादीच्या डोक्यात मारहाण केली. तसेच मोटारसायकल, घरातील टीव्ही आणि कपाटाची काच फोडून नुकसान केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी चिंचवड पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ३२४(४), ३५२ तसेच इतर संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### डंपरच्या धडकेत एक जण ठार

**लोणी काळभोर :** पुणे-सोलापूर महामार्गावर भरधाव वेगाने धावणाऱ्या डंपरच्या धडकेत ५६ वर्षीय पेंटर व्यवसायिकाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी सकाळी कवडीपाट परिसरात घडली. अपघातानंतर संबंधित डंपरच्या पाठीमागील बाजूस नंबर प्लेट नसल्याचे समोर आल्याने पोलीस आणि प्रादेशिक परिवहन विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. मोहन जगन्नाथ माळवदकर (वय ५६, रा. गुजरवस्ती, कवडीपाट, कदमवाकवस्ती, ता. हवेली) असे अपघातात मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. मंगळवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास पुणे-सोलापूर महामार्गावरील कदमवाकवस्ती ग्रामपंचायत हद्दीतील कवडीपाट परिसरात हा अपघात झाला. सुसाट वेगाने येणाऱ्या डंपर हायवाने माळवदकर यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.




### ‘ब्लॅक स्पॉट’वर उपाययोजना करा

**लोणी देवकर :** इंदापूर तालुका आणि शहरातील रस्त्यांवरील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर अपघातप्रवण ठिकाणे अर्थात ‘ब्लॅक स्पॉट’ निश्चित करून तेथे तातडीने आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, अशा सूचना इंदापूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विलास नाळे यांनी दिल्या. यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलिस प्रशासन आणि प्रादेशिक परिवहन विभागाने संयुक्तपणे पाहणी करून सविस्तर अहवाल सादर करावा, असे निर्देशही त्यांनी दिले. इंदापूर पोलिस ठाण्यात आयोजित रस्ता सुरक्षा समिती आणि गतिरोधक समितीच्या बैठकीत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. अपघातप्रवण ठिकाणांचा आढावा घेण्यात आला आणि वाहतूक सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

## मंचर येथील आंदोलनात शेतकरी, विरोधी पक्षांचे नेते ताब्यात

# कांद्याला 25 रुपये दरासाठी रास्ता रोको

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** कांद्याला किमान २५ रुपये प्रतिकिलो बाजारभाव मिळावा या प्रमुख मागणीसाठी शेतकरी आणि विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी मंचरजवळील तांबडेमळा येथील नंदी चौकात जोरदार आंदोलन केले. या आंदोलनामुळे पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली असून दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

आंदोलनात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार निलेश लंके, आमदार रोहित पवार, माजी आमदार अशोक पवार, आमदार अतुल बेनके तसेच आंदोलनाचे निमंत्रक देवदत्त निकम यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते.



सध्याच्या बाजारभावात कांदा उत्पादनाचा भांडवली खर्चही निघत नसल्याने शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे कांद्याला हमीभावासारखा किफायतशीर दर मिळावा आणि सरकारने तातडीने बाजार हस्तक्षेप करावा, या मागणीसाठी आंदोलन करण्यात आल्याचे आंदोलकांनी सांगितले. यावेळी राज्य आणि केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. आंदोलकांनी नंदी चौकात रस्त्यावर ठिय्या आंदोलन करत महामार्ग रोखून धरला. कडाक्याच्या उन्हात अनेक शेतकरी डांबरी रस्त्यावर बसून आंदोलनात सहभागी झाले होते. गळ्यात कांद्याच्या माळा घालून अनेक शेतकऱ्यांनी सरकारच्या धोरणांविरोधात निषेध व्यक्त केला.

यावेळी आमदार रोहित पवार म्हणाले, "कांदा उत्पादक शेतकरी सध्या आर्थिक संकटाच्या गर्तेत सापडला आहे. शेतकऱ्यांना न्याय देण्यात सरकार पूर्णपणे अपयशी ठरले असून तातडीने हस्तक्षेप करण्याची गरज आहे."

शशिकांत शिंदे यांनी सरकारने बाजारात हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली. तर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्य आणि केंद्र सरकारच्या धोरणांमुळे कांदा उत्पादकांचे मोठे नुकसान होत असल्याचा आरोप केला. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस उपविभागीय अधिकारी अमोल मांडवे आणि पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. परिसरात ठिकठिकाणी बॅरिकेड्स उभारण्यात आले होते.

रास्ता रोको आंदोलनानंतर पोलिसांनी हर्षवर्धन सपकाळ, शशिकांत शिंदे, निलेश लंके, रोहित पवार, अशोक पवार, अतुल बेनके, देवदत्त निकम यांच्यासह आंदोलकांना ताब्यात घेऊन मंचर पोलीस ठाण्यात नेले. काही वेळाने त्यांची सुटका करण्यात आली. त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

## आंदोलकांनी चर्चेसाठी पुढे यावे दिलीप वळसे पाटील यांचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न सध्या गंभीर बनला असून, त्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार सकारात्मक भूमिका घेत आहे. आंदोलनाचा मार्ग सोडून आंदोलकांनी चर्चेसाठी पुढे यावे, असे आवाहन माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केले आहे.

आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या कांदा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर वळसे पाटील यांनी शेतकरी आणि आंदोलकांना जाहीर चर्चेचे खुले आमंत्रण दिले. सरकार शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करत असून, त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा करण्याची पूर्ण तयारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "आंदोलकांनी आंदोलन स्थगित करून चर्चेसाठी यावे. त्यांनी बोलावल्यास मी स्वतः आंदोलनस्थळी जाऊन त्यांचे म्हणणे ऐकण्यास तयार आहे. या प्रयत्नामागे कोणताही राजकीय स्वार्थ नसून शेतकऱ्यांचे हित हाच उद्देश आहे," असे वळसे पाटील म्हणाले.

कांदा उत्पादक आणि साखर उद्योगाशी संबंधित प्रश्नांवर केंद्र स्तरावर हालचाली सुरू असल्याची माहिती देताना त्यांनी सांगितले की, गेल्याच आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने नवी दिल्ली येथे केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या बैठकीत कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी आणि साखर उद्योगाशी संबंधित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तामामा भरणे, पणन मंत्री जयकुमार रावल, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्यासह केंद्रीय कृषी मंत्री शिवराज चौहान आणि केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी उपस्थित होते.

## भंडारा खरेदीसाठी सक्ती केल्यास कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** जेजुरी येथील खंडोबा मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना भंडारा किंवा पूजेचे साहित्य खरेदी करण्यासाठी कोणत्याही विशिष्ट दुकानाची सक्ती केली जाणार नाही. अशा प्रकारे दबाव टाकणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा जेजुरी पोलिसांनी दिला आहे.

महाराष्ट्राचे कुलदैवत मानल्या जाणाऱ्या खंडोबाच्या दर्शनासाठी वर्षभर लाखो भाविक जेजुरीत येत असतात. भंडाऱ्याची उधळण ही खंडोबा भक्तीतील महत्त्वाची परंपरा असल्याने मंदिर परिसरात भंडारा आणि पूजेच्या साहित्याची मोठ्या प्रमाणावर विक्री होते. याच कारणामुळे जेजुरीला ‘सोन्याची जेजुरी’ म्हणून ओळखले जाते. मात्र, काही विक्रेत्यांकडून भाविकांवर विशिष्ट दुकानातूनच भंडारा किंवा पूजेचे साहित्य खरेदी करण्यासाठी दबाव टाकला जात असल्याच्या तक्रारी पोलिस प्रशासनाकडे प्राप्त



झाल्या होत्या. काही प्रसंगी यावरून वाद निर्माण होऊन भाविकांना मनस्ताप सहन करावा लागत होता.

या पार्श्वभूमीवर जेजुरीचे सहायक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांनी स्पष्ट केले की, कोणत्याही भाविकाला विशिष्ट दुकानातून खरेदी करण्यास भाग पाडणे किंवा दबाव टाकणे हा गंभीर प्रकार मानला जाईल. अशा तक्रारी आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. जेजुरी परिसरात पार्किंग तसेच भंडारा खरेदीवरून वारंवार वाद होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले होते. भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये आणि त्यांना स्वेच्छेने खरेदी करता यावी, यासाठी पोलिसांनी ही भूमिका घेतली आहे.

भाविकांना कोणत्याही दुकानातून भंडारा आणि पूजेचे साहित्य खरेदी करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. पोलिसांच्या या निर्णयाचे भाविकांकडून स्वागत करण्यात येत असून, मंदिर परिसरातील अनावश्यक वादांना आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# साखर कारखाने काटकसरीने चालवावेत

## कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे मत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर :** खासगी साखर कारखान्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने सहकारी साखर कारखानदारीसमोर अस्तित्व टिकविण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर सहकारी साखर कारखान्यांनी कमी खर्चात, काटकसरीने आणि कार्यक्षमतेने कारभार चालविण्याची आवश्यकता असल्याचे मत राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केले.

श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या वतीने आयोजित सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक, उपाध्यक्ष कैलास गावडे, ॲड. शरद जामदार, रामचंद्र निंबाळकर, शिवाजी निंबाळकर, पृथ्वीराज घोलप, गणपतराव कदम, प्रशांत दराडे, अजित नरुटे, विठ्ठलराव शिंगाडे,




अनिल काटे, बाळासाहेब कोळेकर, संतोष मासाळ, निलेश टिळेकर, सतीश देवकाते, अशोक पाटील, मंथन कांबळे, योगेश पाटील, तानाजी शिंदे, सुचिता सपकळ, माधुरी राजपुरे, कार्यकारी संचालक अशोक जाधव, जनरल मॅनेजर हनुमंत करवर, साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे, सचिव राजेंद्र तावरे, युवराज रणवरे आदी उपस्थित होते.

दत्तात्रय भरणे म्हणाले की, कारखानदारी टिकविण्यासाठी मनुष्यबळावरील खर्चावर नियंत्रण ठेवणे आणि काटकसरीचे धोरण अवलंबणे गरजेचे आहे. कारखान्यावर सुमारे ३१ हजार सभासद, हजारो कामगार आणि ऊसतोडणी मजुरांचे उदरनिर्वाह अवलंबून असल्याने हा कारखाना सक्षमपणे चालणे आवश्यक असून, सभासदांनी आपला ऊस स्वतःच्या कारखान्यात गाळपासाठी द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक म्हणाले की, व्यवस्थापन आणि कामगार यांच्यामध्ये कोणतीही दरी नसलेला श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना आहे. कारखान्याच्या उभारणीत सभासदांसोबतच कामगारांचाही सिंहाचा वाटा आहे. ‘माझा कारखाना, माझी जबाबदारी’ या संकल्पनेतून मागील गाळप हंगाम यशस्वीपणे पूर्ण करण्यात आला. आर्थिक अडचणींच्या काळातही कामगारांना प्रत्येक महिन्याच्या सात तारखेपूर्वी वेतन देण्याची परंपरा कायम ठेवण्यात आली आहे. कामगारांनी स्वतःचा तसेच नातेवाईक व मित्रमंडळींचा ऊस कारखान्याकडे वळविण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले.

छत्रसमारंभात कारखान्यातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करून त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला कामगार, सभासद आणि विविध मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## पोलीस दलात भरती झालेल्या विद्यार्थ्यांचा गौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी देवकर :** अथक परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर पोलीस दलात भरती होऊन यश मिळविणाऱ्या पळसनाथ विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा पळसनाथ शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने गौरव करण्यात आला. पळसदेव (ता. इंदापूर) येथील पळसनाथ विद्यालयात आयोजित सत्कार समारंभात या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना पळसनाथ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष भूषण काळे यांनी ग्रामीण भागातील युवकांनी सातत्यपूर्ण अभ्यास, सराव आणि कष्टाच्या जोरावर पोलीस दलासह विविध क्षेत्रांत यश मिळविले असल्याचे सांगितले. या विद्यार्थ्यांच्या यशामुळे पळसदेव गाव आणि इंदापूर तालुक्याचा नावलौकिक वाढल्याचे त्यांनी नमूद केले.

पळसनाथ विद्यालयात माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केलेल्या आणि विविध शासकीय




सेवांमध्ये निवड झालेल्या स्वप्निल राजेंद्र बांडे (पालघर पोलीस), करण बापू इंगळे (पुणे शहर पोलीस), नवनाथ गणपत तनपुरे (एसआरपीएफ, मुंबई), गणेश राजेंद्र चव्हाण (मुंबई शहर पोलीस), सौरभ राजेंद्र जगताप (पुणे पोलीस दल) तसेच आदित्य पांडुरंग चव्हाण (ज्युनिअर असिस्टंट मॅनेजर, आयडीबीआय बँक) यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना या युवकांनी विद्यालयातील शिक्षणकाळात शिक्षकांनी केलेले मार्गदर्शन, खेळ व शारीरिक तंदुरुस्तीच्या सरावामुळे यश मिळविण्यास मोठी मदत झाल्याची भावना व्यक्त केली. तसेच आपल्या यशामागे पळसनाथ विद्यालयाचा मोठा वाटा असल्याचे सांगत त्यांनी संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमास पळसनाथ शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव योगीराज काळे, संचालक राजेंद्र काळे, बाळासाहेब नाईकवाडी, बबन काळे, विद्यालयाचे प्राचार्य विकास पाठक, पर्यवेक्षक संजय जाधव, सिकंदर देशमुख, नितीन जगदाळे, अशोक जाधव, संतोष पवार यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी भगवान खारतोडे यांचे उपोषण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर :** खडकवासला उजव्या कालव्याचे आवर्तन तातडीने सुरू करावे, पाण्याअभावी नुकसान झालेल्या पिकांना भरपाई द्यावी तसेच शेतकऱ्यांच्या विविध मागण्या मान्य कराव्यात, अशा मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते भगवान खारतोडे यांनी कळस येथील तलाठी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले.

तहसीलदार, मंडलाधिकारी, तलाठी, कृषी अधिकारी तसेच खडकवासला उजवा कालवा शाखेच्या अभियंत्यांना निवेदन देण्यात आले होते. मात्र मागण्यांबाबत कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने उपोषणाचा मार्ग स्वीकारल्याचे खारतोडे यांनी सांगितले. खारतोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, खडकवासला उजव्या कालव्यावरील तरंगवाडी, कौठळी, न्हावी, रुई, कळस, अकोले, पिंपळे, शेटफळगडे आणि निरगुडे परिसरात शेतीसह ग्रामस्थांच्या व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. मागील तीन महिन्यांपासून कालव्याला आवर्तन मिळाले नसल्याने ऊसासह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. १२ मे रोजी सोडण्यात आलेले उन्हाळी आवर्तन शेवटच्या टोकापर्यंत पोहोचण्यापूर्वीच बंद करण्यात आले. त्यामुळे पाणीपुरवठा योजनांनाही फटका बसला असून अनेक गावांमध्ये पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. तरंगवाडी, कौठळी, न्हावी, रुई, कळस, अकोले, पिंपळे, शेटफळगडे आणि निरगुडे येथील पाणीपुरवठा योजनांचे तलाव खडकवासला कालव्याच्या पाण्याने भरून द्यावेत, पाण्याअभावी जळालेल्या ऊस व इतर पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना प्रतिएकर ५० हजार रुपयांची नुकसानभरपाई द्यावी, अशी त्यांची मागणी आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती जारकरवाडीत उत्साहात



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील जारकरवाडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

जयंतीनिमित्त ग्रामपंचायत कार्यालय तसेच पांडुरंग मंदिर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याला अभिवादन करत त्यांच्या लोककल्याणकारी, समाजहितकारी आणि प्रेरणादायी कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थितांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या आदर्श विचारांचे अनुसरण करून समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. या प्रसंगी गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठानचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुयोग्य नियोजन आणि ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे जयंती सोहळा उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला.

## ऊस लागवड हंगाम १ जुलै ते ३१ मार्च दरम्यान

# श्री छत्रपती कारखान्याचे ऊस लागवड धोरण जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर :** श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याने गाळप हंगाम २०२६-२७ साठी ऊस लागवड धोरण जाहीर केले आहे. यंदाचा ऊस लागवड हंगाम १ जुलै २०२६ ते ३१ मार्च २०२७ दरम्यान राहणार असून, गाळप हंगाम सुरू झाल्यापासून संपेपर्यंत तुटलेल्या उसाचे खोडवे व निडवे ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे. कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक आणि उपाध्यक्ष कैलास गावडे यांनी ही माहिती




दिली.

आडसाली हंगामासाठी १ जुलै ते १५ जुलै २०२६ या कालावधीत को.एम. २६५ या जातीच्या उसाच्या लागवडीस परवानगी देण्यात आली आहे. तर १६ जुलै ते ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत को. ८६०३२ आणि पीडीएन-१५०१२ या जातींची लागवड करता येणार आहे. गाळप हंगाम २०२७-२८ साठी आडसाली नोंद क्षेत्रापैकी ९० टक्के क्षेत्र को. ८६०३२ व पीडीएन-१५०१२ या जातींचे, तर १० टक्के क्षेत्र को.एम. २६५, एमएस-१०००१, फुले-१३००७ आणि फुले-१५००६ या जातींचे असणार आहे. या क्षेत्राची तोडणी आडसाली हंगाम संपेपर्यंत करण्यात येणार आहे.

पूर्वहंगामी लागवडीसाठी १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत को. ८६०३२, एमएस-१०००१, पीडीएन-१५०१२, फुले-१५००६ आणि फुले-१३००७ या जातींना परवानगी देण्यात आली आहे. आडसाली क्षेत्र संपल्यानंतर पूर्वहंगामी को. ८६०३२ आणि पीडीएन-१५०१२ या जातींसह लवकर पक्व होणाऱ्या जातींची लागण तारखेनुसार तोडणी करून गाळपास स्वीकारण्यात येणार आहे. हंगामासाठी १ डिसेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत को. ८६०३२, एमएस-१०००१, पीडीएन-१५०१२, फुले-१३००७ आणि फुले-१५००६ या जातींच्या लागवडीस मान्यता देण्यात आली आहे. पूर्वहंगामी आणि आडसाली क्षेत्र संपल्यानंतर सुरू हंगामातील नोंदीनुसार ऊस तोडणी करून गाळपास स्वीकारण्यात येणार आहे.

खोडवा धोरणानुसार गाळप हंगाम सुरू झाल्यापासून संपेपर्यंत को. ८६०३२, एमएस-१०००१, पीडीएन-१५०१२ आणि को.एम. २६५ या जातींच्या खोडवा उसाची तोडणी केली जाणार आहे. १ डिसेंबरपासून नोंद क्षेत्रातील २० टक्के खोडवा क्षेत्राचे नियोजन करण्यात आले असून त्यानुसार ऊस गाळपास स्वीकारला जाणार आहे. कारखान्याने जाहीर केलेल्या या धोरणामुळे सभासद शेतकऱ्यांना ऊस लागवड नियोजन आणि भविष्यातील गाळप व्यवस्थापनाबाबत स्पष्ट दिशा मिळणार असल्याचे सांगण्यात आले.

## रामदास वाकचौरे यांना ‘अक्षर गौरव पुरस्कार’

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** पंढरपूर येथे आयोजित राज्यस्तरीय अक्षर संमेलनात मराठी कॅलिग्राफी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल धामणी (ता. आंबेगाव) येथील रामदास वाकचौरे यांना प्रतिष्ठेचा ‘अक्षर गौरव पुरस्कार’ प्रदान करण्यात आला.

पंढरपूर विभागाचे पोलीस अधिकारी प्रशांत डगाळे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास होप फाउंडेशनचे अध्यक्ष नरेंद्र महाडिक, मुख्याधिकारी शुभम गायकवाड, महसूल व वन विभाग मंत्रालयाचे उपसचिव संजय इंगळे तसेच ज्येष्ठ रांगोळी चित्रकार महादेव गोपाळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

मराठी कॅलिग्राफी कलेचे संवर्धन आणि प्रसार करण्यासाठी रामदास वाकचौरे सातत्याने कार्यरत आहेत.

सुंदर हस्ताक्षर आणि अक्षरकलेचे महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

मराठी अक्षरकलेच्या जतनासाठी आणि कॅलिग्राफीच्या माध्यमातून भाषिक सौंदर्य जपण्यासाठी वाकचौरे यांनी केलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे मान्यवरांनी यावेळी नमूद केले.

## सारांश वृत्त

### धुळीच्या वादळात दोघांचा मृत्यू

**जयपूर:** राजस्थानच्या बाडमेर जिल्ह्यातील काही भागांमध्ये पावसासह आलेल्या जोरदार धुळीच्या वादळामुळे घरांचे नुकसान झाले आणि वीजपुरवठा खंडित झाला, यात दोन मुलांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले, अशी माहिती पोलिसांनी दिली. रात्री उशिरा ग्रामीण भागात सोसाट्याच्या वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे झाडे, विजेचे खांब आणि पत्र्याचे शेड उन्मळून पडले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### जनगणना कर्मचाऱ्यांवर एफआयआर दाखल

**नोएडा** : वारंवार पत्रव्यवहार करूनही जनगणना २०२७ ची कामे स्वीकारण्यास कथितपणे नकार देणाऱ्या २९ गणकांविरुद्ध ग्रेटर नोएडा प्रशासनाने एफआयआर नोंदवण्याची मागणी केली आहे, असे अधिकाऱ्यांनी मंगळवारी सांगितले. ग्रेटर नोएडा प्राधिकरणाच्या निवेदनानुसार, जनगणना मोहिमेच्या प्रभारी अधिकाऱ्याने, देशव्यापी मोहिमेसंबंधित शासकीय कर्तव्यात असहकार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करत, नोएडाचे पोलीस उपआयुक्त यांना पत्र लिहिले आहे. ग्रेटर नोएडा परिसरात जनगणनेसाठी सुमारे ३,००० कर्मचाऱ्यांना गणक म्हणून कर्तव्यावर नेमण्यात आले आहे. मात्र, विहित मुदत उलटून गेल्यानंतरही त्यापैकी २९ जणांनी आपल्या कामाचा कार्यभार स्वीकारलेला नाही," असे निवेदनात म्हटले आहे.

### केरळमध्ये अतिवृष्टीची शक्यता

**तिरुवनंतपुरम** : हवामान विभागाने मंगळवारी केरळमध्ये येत्या काही दिवसांत अतिवृष्टीचा अंदाज वर्तवला असून, २ ते ५ जून दरम्यान अनेक जिल्ह्यांमध्ये 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. तसेच, नैऋत्य मोसमी पाऊस ४ जूनपर्यंत केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता असल्याचेही त्यात म्हटले आहे. भारतीय हवामान विभागाने मंगळवारसाठी तीन जिल्ह्यांकरिता, मलप्पुरम, कोझिकोड आणि वायनाड येथे 'ऑरेंज अलर्ट' आणि उर्वरित जिल्ह्यांकरिता 'यलो अलर्ट' जारी केला आहे.

### डसॉल्ट एव्हिएशनला लेटर ऑफ रिक्वेस्ट पाठवले

# भारताच्या राफेल विमान खरेदीला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारतीय हवाई दलाची लढाऊ क्षमता वाढविण्यासाठी भारताने फ्रान्सकडून ११४ राफेल लढाऊ विमाने खरेदी करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. या बहुचर्चित करारासाठी भारताने फ्रेंच कंपनी डसॉल्ट एव्हिएशन यांना मागणीपत्र (लेटर ऑफ रिक्वेस्ट) पाठविले असून, पुढील तीन महिन्यांत फ्रान्सकडून प्रतिसाद अपेक्षित आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, प्रस्तावित करारांतर्गत ११४ पैकी ९४ राफेल विमाने भारतातच तयार केली जाणार आहेत. फ्रान्सबाहेर प्रथमच राफेल विमानांचे उत्पादन होणार असून, या प्रक्रियेत सुमारे ५० टक्के स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. त्यामुळे देशातील संरक्षण उत्पादन क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे.



राफेल ही ४.५-जनरेशन प्लस श्रेणीतील अत्याधुनिक लढाऊ विमाने मानली जातात. बियॉन्ड व्हिज्युअल रेंज क्षेपणास्त्र क्षमता, प्रगत रडार प्रणाली आणि बहुउद्देशीय युद्धकौशल्यामुळे ही विमाने जगातील सर्वात प्रभावी लढाऊ विमानांपैकी एक समजली जातात. सीमारेषा ओलांडल्याशिवाय दूरवर अचूक हल्ले करण्याची क्षमता राफेलला विशेष बनवते. भारतीय हवाई दलाकडे सध्या ३६ राफेल विमाने कार्यरत आहेत. नव्या करारानंतर हवाई दल आणि नौदलाच्या ताफ्यातील राफेल विमानांची संख्या लक्षणीय वाढणार आहे. भारतीय नौदलानेही सागरी सुरक्षेसाठी ३१ राफेल मरीन विमानांची मागणी केली आहे. त्यामुळे भविष्यात भारतीय सशस्त्र दलांकडे २०० हून अधिक राफेल विमाने असण्याची शक्यता आहे. ही खरेदी हवाई दलाच्या मल्टी-रोल फायटर एअरक्राफ्ट कार्यक्रमाचा भाग आहे. सध्या हवाई दलाकडे २९ स्क्वॉड्रन असून राष्ट्रीय सुरक्षेच्या गरजांसाठी किमान ४२.५ स्क्वॉड्रनची आवश्यकता असल्याचे संरक्षण तज्ज्ञांचे मत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संभाव्य फ्रान्स दौऱ्यात या करारावर महत्त्वपूर्ण चर्चा होण्याची शक्यता आहे. तसेच हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग हेही डसॉल्ट एव्हिएशनच्या उत्पादन सुविधांना भेट देण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

संरक्षण अधिकाऱ्यांच्या मते, या करारामुळे राफेल विमानांमध्ये स्वदेशी शस्त्रप्रणाली आणि भारतीय तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण अधिक सुलभ होईल. तसेच संरक्षण उत्पादन क्षेत्रात तंत्रज्ञान हस्तांतरण, रोजगारनिर्मिती आणि दीर्घकालीन स्वावलंबनाच्या दृष्टीने हा करार भारतासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

## संसदीय समितीसमोर संधी नाकारली...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : नीट-यूजी पेपरफुटी प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणाऱ्या डॉक्टरांच्या संघटनेच्या प्रतिनिधींना संसदेच्या स्थायी समितीसमोर आपली बाजू मांडण्याची संधी नाकारण्यात आल्याची माहिती आहे. सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांच्या आक्षेपानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले आहे.

संसदेची शिक्षण, महिला, बालक, युवक आणि क्रीडा विषयक स्थायी समिती राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांसाठी पारंपरिक लेखी परीक्षा पद्धती आणि संगणकाधारित परीक्षा (सीबीटी) यांचे फायदे-तोटे यावर चर्चा करण्यासाठी सोमवारी एकत्र आली होती. या बैठकीसाठी पेपरफुटी प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केलेल्या युनायटेड डॉक्टर्स फ्रंट (यूडीएफ) या संघटनेच्या प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले होते. मात्र, भारतीय जनता पक्षाच्या खासदारांनी आक्षेप घेतल्यानंतर त्यांना सादरीकरण करू देण्यात आले नाही.

यूडीएफने आपल्या याचिकेत राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) बरखास्त करून तिच्या जागी कायद्याद्वारे स्थापन करण्यात आलेली स्वतंत्र आणि अधिक सक्षम संस्था उभारण्याची मागणी केली आहे. पेपरफुटीनंतर परीक्षा प्रक्रियेत गंभीर त्रुटी असल्याचा आरोपही संघटनेने केला आहे.

एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंह यांनी समितीला माहिती देताना २०२७ पासून नीट परीक्षा संगणकाधारित पद्धतीने घेण्याचा विचार सुरू असल्याचे सांगितले. मात्र, सध्या २१ जून रोजी होणारी पुनर्परीक्षा सुरळीत आणि सुरक्षितपणे पार पाडणे हेच प्राधान्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. समितीचे अध्यक्ष आणि काँग्रेसचे खासदार दिग्विजय सिंह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नीट पुनर्परीक्षेची जबाबदारी स्वतः घेतल्याची माहिती सार्वजनिक क्षेत्रात आली असल्याचे सांगितले. त्यामुळे कोणतीही त्रुटी होणार नाही, अशी अपेक्षा असल्याचे त्यांनी नमूद केले.

## ममतांच्या आंदोलनाला परवानगी नाकारली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगालच्या राजकारणात मंगळवारी नाट्यमय घडामोडी घडल्या. तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा आणि माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पोलिसांची परवानगी न घेता कोलकात्यातील एस्प्लेनेड परिसरात आंदोलन छेडले. भाजपविरोधात आणि निवडणुकीनंतरच्या कथित हिंसाचाराच्या निषेधार्थ आयोजित या आंदोलनादरम्यान पोलिसांनी परवानगी नाकारल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले.

ममता बॅनर्जी यांच्यासमवेत त्यांचे पुतणे व तृणमूल काँग्रेसचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी, ज्येष्ठ नेते मदन मित्रा आणि खासदार कल्याण बॅनर्जी उपस्थित होते. याशिवाय फिरहाद हकीम, डेरेक ओ'ब्रायन आणि डोला सेन यांनीही आंदोलनात सहभाग घेतला. मात्र, अलीकडेच निवडून आलेले अनेक आमदार अनुपस्थित राहिल्याने पक्षांतर्गत नाराजीची चर्चा रंगली.

एस्प्लेनेड येथील वाय-चॅनल परिसरात आंदोलन करण्यास कोलकाता पोलिसांनी परवानगी नाकारली. तसेच राणी रासमणी रोडवर आंदोलन करण्याची तृणमूल काँग्रेसची मागणीही फेटाळण्यात आली. यानंतर पोलिस आणि कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक वाद झाल्याने काही काळ तणाव निर्माण झाला. आंदोलनस्थळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते जमले होते. ममता बॅनर्जी यांना संबोधित करताना कार्यकर्त्यांकडून घोषणाबाजी करण्यात आली.

यावेळी बोलताना ममता बॅनर्जी यांनी विधानसभा निवडणुकीतील मतमोजणी प्रक्रियेवर गंभीर आरोप केले. भाजपने २९४ पैकी १७७ मतदारसंघांमध्ये मतमोजणीत फेरफार केल्याचा दावा त्यांनी केला. तसेच तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना आंदोलनात सहभागी होण्यापासून रोखण्यासाठी पोलिसांकडून दबाव टाकला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

## ‘वंदे मातरम्’च्या सक्तीवर थरूर यांचा सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी प्रत्येक सार्वजनिक कार्यक्रमात ‘वंदे मातरम्’ची पाचही कडवी म्हणणे अनिवार्य करण्याच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. राष्ट्रगीताचा आदर आणि प्रत्येक कार्यक्रमात त्याचे संपूर्ण पठण बंधनकारक करणे या दोन वेगळ्या बाबी असल्याचे सांगत त्यांनी अशा सक्तीला “अनावश्यक आणि ओझे” असे संबोधले.

शासकीय कार्यक्रमांमध्ये ‘वंदे मातरम्’ संपूर्ण स्वरूपात गायले जावे, या मागणीवरून सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर थरूर यांनी ही भूमिका मांडली. पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, ‘वंदे मातरम्’ हे राष्ट्रगीत असल्याने त्याला सर्वांचा आदर आहे आणि ते गायले जात असताना नागरिक सन्मानाने उभे राहतात.



“वंदे मातरम्’चा पहिला किंवा सुरुवातीची दोन कडवी बहुतेकांना तोंडपाठ असतात. परंपरेनुसार कार्यक्रमाच्या प्रारंभी ‘वंदे मातरम्’ आणि शेवटी राष्ट्रगीत सादर केले जाते. मात्र प्रत्येक कार्यक्रमाच्या सुरुवातीला आणि शेवटी पाचही कडवी गाण्याची सक्ती करणे योग्य वाटत नाही,” असे थरूर यांनी नमूद केले. थरूर यांच्या वक्तव्यावर भाजपने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी काँग्रेसवर राष्ट्रसन्मानाच्या मुद्द्यावर दुटप्पी भूमिका घेत असल्याचा आरोप केला. “काँग्रेसने पुन्हा एकदा ‘वंदे मातरम्’च्या संपूर्ण गायनाला विरोध दर्शविला आहे. हा राष्ट्रसन्मानाचा प्रश्न आहे,” असे ते म्हणाले. पूनावाला यांनी काँग्रेसवर केरळमधील मुस्लिम लीगच्या दबावाखाली भूमिका घेतल्याचाही आरोप केला. त्यांनी भूतकाळातील राजकीय घटनांचा संदर्भ देत काँग्रेसने यापूर्वीही अशाच प्रकारे तडजोडी केल्याचा दावा केला. भाजपचे प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनीही थरूर यांच्या भूमिकेवर टीका केली.

## सीबीएसई पुनर्मूल्यांकन पोर्टलमध्ये तांत्रिक अडचणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) बारावीच्या परीक्षेतील गुणांच्या पुनर्मूल्यांकनासाठी सुरू करण्यात आलेल्या ऑनलाइन पोर्टलमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. पोर्टलवर लॉगिन करताना आणि पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज दाखल करताना अनेक विद्यार्थ्यांना अडथळ्यांचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत.

पुनर्मूल्यांकनासाठीचे पोर्टल सुरुवातीला २९ मे रोजी सुरू होणार होते. मात्र, ते पुढे १ जून आणि त्यानंतर २ जूनपर्यंत पुढे ढकलण्यात आले. मंगळवारी पहाटे सीबीएसईने सामाजिक माध्यमांद्वारे पोर्टल सुरू झाल्याची घोषणा केली आणि वापरासाठी मार्गदर्शक व्हिडीओही प्रसिद्ध केला. यापूर्वी ऑन-स्क्रीन मूल्यांकन प्रणालीबाबत वाद निर्माण झाल्यानंतर बारावीच्या ९८ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी चार लाखांपेक्षा जास्त उत्तरपत्रिकांच्या स्कॅन प्रती पाहण्यासाठी अर्ज केले होते. त्यानंतर पुनर्मूल्यांकन प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली. मात्र, पोर्टल सुरू झाल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी तांत्रिक अडचणींची तक्रार केली. वकील विनीत जिंदाल यांनी सामाजिक माध्यमांवर विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींचा उल्लेख करत सीबीएसईने या समस्यांकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली. विद्यार्थ्यांच्या नियंत्रणाबाहेरील तांत्रिक त्रुटींमुळे त्यांचे नुकसान होऊ नये, असे त्यांनी म्हटले.

काही विद्यार्थ्यांनी लॉगिन प्रक्रियेदरम्यान सत्यापन अयशस्वी झाल्याचे संदेश दिसत असल्याची तक्रार केली. तर काहींना लॉगिन रिक्वेस्ट टाइमआउट किंवा ४०१ ऑथेंटिकेशन फेल्ड असे संदेश मिळत असल्याचे सांगितले.

### सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या ३७ वर

## पाच नव्या न्यायाधीशांचा शपथविधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाच्या पाच नव्या न्यायाधीशांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात झालेल्या या शपथविधी सोहळ्यानंतर न्यायालयातील कार्यरत न्यायाधीशांची संख्या ३७ वर पोहोचली असून, न्यायालयाच्या इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वाधिक संख्या आहे. नवनियुक्त न्यायाधीशांमध्ये शील नागू, चंद्रशेखर, संजीव सचदेवा, अरुण पल्ली आणि व्ही. मोहना यांचा समावेश आहे.



केंद्र सरकारने सोमवारी या पाच नियुक्त्यांना मंजुरी दिली होती. त्यानुसार पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती शील नागू, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती चंद्रशेखर, मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती संजीव सचदेवा, जम्मू-काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती अरुण पल्ली तसेच ज्येष्ठ विधिज्ञ व्ही. मोहना यांची सर्वोच्च न्यायालयात नियुक्ती करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने २७ मे रोजी या पाच नावांची शिफारस केली होती. चार दिवसांत केंद्र सरकारने त्याला मंजुरी दिल्यानंतर नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण झाली.

केंद्र सरकारने अध्यादेशाद्वारे सर्वोच्च न्यायालयातील मंजूर न्यायाधीशांची संख्या वाढवली आहे. या सुधारणेनुसार सरन्यायाधीशांसह न्यायाधीशांची कमाल संख्या ३४ वरून ३८ करण्यात आली आहे. नव्या नियुक्त्यांनंतर कार्यरत न्यायाधीशांची संख्या ३७ झाली असून ती मंजूर संख्येपेक्षा केवळ एकने कमी आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पंकज मिथाल हे १६ जून रोजी, तर न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी हे २८ जून रोजी निवृत्त होणार आहेत. त्यामुळे आगामी काळात न्यायालयाच्या संख्याबळात पुन्हा बदल होणार आहे. नव्या नियुक्त्यांमध्ये व्ही. मोहना यांची नियुक्ती महत्त्वाची मानली जाते. २०१८ मध्ये इंदू मल्होत्रा यांच्यानंतर वकिली व्यवसायातून थेट सर्वोच्च न्यायालयात नियुक्त होणाऱ्या त्या देशातील दुसऱ्या महिला ठरल्या आहेत. १९८८ पासून वकिली क्षेत्रात कार्यरत असलेल्या मोहना यांना २०१५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ज्येष्ठ वकील म्हणून मान्यता दिली होती. सर्वोच्च न्यायालयात महिला न्यायाधीशांमध्ये आता व्ही. मोहना आणि बी. व्ही. नागरत्ना यांचा समावेश आहे. न्यायमूर्ती नागरत्ना या भविष्यात सरन्यायाधीशपदी विराजमान होण्याच्या शर्यतीत आहेत.

## अण्णामलाई भाजपमधून बाहेर पडणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : तामिळनाडू भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष के. अण्णामलाई हे भाजपपासून फारकत घेऊन स्वतंत्र राजकीय पक्ष स्थापन करण्याच्या तयारीत असल्याच्या चर्चांना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी मंगळवारी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची भेट घेतली असून, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशीही ते चर्चा करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अण्णामलाई यांनी भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस (संघटन) बी. एल. संतोष आणि पक्षाध्यक्ष नितीन नवीन यांची भेट घेतली. तामिळनाडूमध्ये राष्ट्रवादी विचारधारेवर आधारित नवीन राजकीय पक्ष उभारण्याच्या तयारीत असल्याच्या वृत्तांच्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, अण्णामलाई यांनी पक्ष नेतृत्वाला आपल्याला राजकीयदृष्ट्या स्वतंत्र मार्ग स्वीकारायचा असल्याचे सांगितले. त्यांनी भाजपमधून सौहार्दपूर्ण पद्धतीने बाहेर पडण्याची इच्छा व्यक्त केल्याचेही समजते. त्यांनी राजीनामा दिल्याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नसली तरी बैठकीदरम्यान त्यांनी पक्ष नेतृत्वाकडे राजीनामा सादर केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी अण्णामलाई यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले जाते. पक्षासाठी केलेल्या कामाचा उल्लेख करताना अण्णामलाई भावूक झाल्याचेही सूत्रांनी म्हटले आहे. तामिळनाडूमध्ये भाजपचा विस्तार करण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची पक्ष नेतृत्वाने दखल घेतल्याचे समजते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) नेही अण्णामलाई यांना भाजपमध्येच राहण्याचा सल्ला दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. संघाकडून त्यांना भविष्यातील सक्षम नेतृत्व म्हणून पाहिले जात असल्याचे सांगितले जाते.

भाजप नेतृत्वाने अण्णामलाई यांना राष्ट्रीय पातळीवरील जबाबदाऱ्या तसेच राज्यसभेची संधी यांसारखे पर्याय सुचविले होते. मात्र त्यांनी हे सर्व प्रस्ताव नाकारल्याचे वृत्त आहे. भाजपमध्ये व्यवहार्य राजकीय भविष्य दिसत नसल्याने त्यांनी वेगळा मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतल्याचेही सांगितले जात आहे.

## अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात मोहीम

**जम्मू** : जम्मू आणि काश्मीरच्या अमली पदार्थ तस्करीविरोधी मोहिमेच्या पहिल्या ५० दिवसांत, नार्कोटिक ड्रग्स अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस (एनडीपीएस) कायद्यांतर्गत १७६ गुन्हे दाखल करण्यात आले आणि २०२ आरोपींना अटक किंवा ताब्यात घेण्यात आले, अशी माहिती पोलिसांनी दिली. माहिती संकलन, अंमलबजावणीचे उपाय, सामुदायिक सहभाग आणि कायदेशीर कारवाई यांच्या पाठबळावर ही मोहीम यशस्वी ठरत आहे, असे सांगण्यात आले.

## अमेरिकेतील बेकायदेशीर ३० भारतीय चालकांना अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन** : अमेरिकेत बेकायदेशीरपणे वास्तव्यास राहून व्यावसायिक ट्रक चालक म्हणून काम करणाऱ्या ३० भारतीय नागरिकांना संघीय कारवाईदरम्यान अटक करण्यात आली असून, त्यांच्याविरोधात हद्दपारीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

अमेरिकेच्या सीमाशुल्क आणि सीमा सुरक्षा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ११ ते १५ मे दरम्यान ॲरिझोना राज्यातील युमा सेक्टरमध्ये राबविण्यात आलेल्या ऑपरेशन चेकमेट अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेदरम्यान एकूण ५२ कागदपत्रविरहित व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले. त्यामध्ये सेमी-ट्रक चालवत असलेल्या ३६ जणांचा समावेश होता. अटक करण्यात आलेल्या ३६ ट्रक चालकांपैकी ३० जण भारतीय नागरिक असून उर्वरित सहा जण मेक्सिको, एल साल्वाडोर आणि रशिया या देशांतील आहेत.

तपासादरम्यान काही चालकांकडे कॅलिफोर्निया, न्यूयॉर्क, वॉशिंग्टन आणि व्हर्जिनिया राज्यांनी जारी केलेले व्यावसायिक वाहनचालक परवाने आढळले.

काहींकडे वैध वाहनचालक कागदपत्रे नव्हती. तसेच अनेकांकडे माजी राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्या कार्यकाळात जारी करण्यात आलेली रोजगार परवानगी कागदपत्रे होती, परंतु त्यांची मुदत संपल्याने ती वैध राहिली नव्हती.


### मे महिन्यात १४५ दशलक्ष टन मालाची ने-आण

# जागतिक आव्हानांना न जुमानता मालवाहतुकीत वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पश्चिम आशियातील बदलत्या भू-राजकीय परिस्थितीमुळे आणि त्याचा जागतिक लॉजिस्टिक्स व्यवस्थेवर होणाऱ्या परिणामामुळे निर्माण झालेल्या आव्हानांदरम्यानही भारतीय रेल्वेने मे २०२६ मध्ये १४५ दशलक्ष टन मालाची वाहतूक केली. हा आकडा मे २०२५ च्या तुलनेत १.३ टक्के अधिक असल्याची माहिती रेल्वे मंत्रालयाने दिली.

लोहखनिज, पोलाद, खते आणि इतर विविध वस्तूंच्या वाहतुकीत झालेल्या वाढीमुळे मालवाहतुकीत ही वाढ नोंदविण्यात आली. मंत्रालयाच्या



माहितीनुसार, इतर वस्तूंच्या विभागात गेल्या वर्षीच्या तुलनेत १६ टक्क्यांची वाढ झाली आहे. लोहखनिज वाहतुकीत ४.८ टक्के, तर पिग आयर्न आणि फिनिश्ड स्टीलच्या वाहतुकीत ३.५ टक्के वाढ झाली. खतांच्या वाहतुकीतही ६.२ टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली.

रेल्वे मालवाहतुकीतील सर्वात मोठा घटक असलेल्या कोळसा वाहतुकीतही सातत्य कायम राहिले असून, त्यामध्ये वार्षिक तुलनेत सुमारे १ टक्क्यांची वाढ झाली आहे. औष्णिक ऊर्जा प्रकल्पांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि देशाची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी कोळसा वाहतुकीला प्राधान्य देण्यात आल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. मालवाहतूक सुरळीत राहावी आणि पुरवठा साखळीची कार्यक्षमता अबाधित राहावी यासाठी देशांतर्गत तसेच आयात-निर्यात कंटेनर वाहतुकीवर भारतीय रेल्वेने अधिक बारकाईने लक्ष केंद्रित केले असल्याचेही मंत्रालयाने सांगितले.

दरम्यान, प्रवासी वाहतुकीतही वाढ झाली आहे. मे २०२६ मध्ये ६१ कोटींहून अधिक प्रवाशांनी रेल्वेने प्रवास केला, तर मे २०२५ मध्ये हा आकडा सुमारे ५९ कोटी होता. उपनगरेतर विभागातील प्रवाशांची संख्या २८ कोटींवरून ३० कोटींवर गेल्याने ७.४ टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली.

उन्हाळी सुट्ट्यांमधील वाढलेली प्रवासी मागणी पूर्ण करण्यासाठी भारतीय रेल्वेने विविध मार्गांवर विशेष उन्हाळी गाड्या चालवल्या. सध्या देशभरात १६४ वंदे भारत सेवा कार्यरत असून, त्यामध्ये हावडा- कामाख्या मार्गावरील नव्याने सुरू करण्यात आलेल्या स्लीपर वंदे भारत सेवेचाही समावेश आहे. मे २०२६ मध्ये आणखी तीन नवीन सेवांचे उद्घाटन झाल्याने अमृत भारत एक्स्प्रेस सेवांची संख्या वाढून ६८ वर पोहोचली असल्याची माहिती रेल्वे मंत्रालयाने दिली.